# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक :**

**कुलसचिव यांचे कार्यालय**

**दिनांक- २४ जून, २०१८**

**विषय- महाराष्ट्र विधान परिषदेची पदवीधर / शिक्षक द्विवार्षिक निवडणूक २०१८**
**मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी विशेष नैमितिक रजा मंजूर करण्याबाबत**

**संदर्भ- मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे बीआयई(G&T)२०१८/प्र.क्र.४६१/का.३३, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक-५ जून, २०१८ चे संदर्भाधीन पत्र**

मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठाच्या आदर्श महाविद्यालयांचे समन्वयक आणि मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे की, भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दिनांक २५ जून, २०१८ रोजी मुंबई पदवीधर आणि शिक्षक तसेच कोकण पदवीधर मतदार संघातील विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे. याअनुषंगाने या निवडणूकीसाठी मतदार असलेल्या पदवीधर/ शिक्षक मतदार संघातील मतदारांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी त्या दिवसाची विशेष नैमितिक रजा मंजूर करण्यात येत असून सदरची रजा ही अनुज्ञेय असलेल्या नैमितिक रजेव्यतिरिक्त असणार आहे. सबब वर उल्लेखित सर्व प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांना कळविण्यात येत आहे की त्यांनी मतदानाचा हक्क बजावून आलेल्या शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना विशेष नैमितिक रजा मंजूर करावी.

स्वाक्षरीत /

( डॉ. दिनेश कांबळे)

कुलसचिव (प्र.)